# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २७/०४/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. बेला** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील मौजा कळमना येथे दि. २६/०४/२०२२ चे १६.४५ वा. सुमारास आरोपी नामे– युवराज बापुराव नौकरकर, वय १९ वर्ष, रा. बेला हा आपल्या ॲक्टीवा गाडीने चंदु उर्फ नितेश पांडुरंग सावरकर(जखमी), वय ३२ वर्ष, रा. बेला याच्या चहा टपरी समोर येवुन त्याच्या सोबत तोंडातोंडी वाद करून शिवीगाळ केली. यानंतर आरोपीने त्याच्या सोबत भांडण करून सोबत आणलेल्या चाकुने जखमीस सात ते आठ घाव मारून जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करून जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी नामे– प्रशांत विठोबाजी भोंडगे वय ४३ वर्ष, रा. बेलायांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४ भादंवि. सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. प्रशांत भोयर मोन ९९२३१११२७० हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील बिना संगम येथे दिनांक २६/०४/२०२२ चे ०९.३० वा. ते ०९.५० वा. दरम्यान एमच–४०/सीडी–६९११ क्रमांकाचा टाटा ट्रकचा चालक आरोपी नामे– सुरेन्द्र प्रेमलालजी ठाकरे रा. वार्ड नं. ०४ बिना संगम खापरखेडा त्याच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या ३ ब्रास रेती किं. ९,०००/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण १२,०९,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई अश्विन गजभिये पो.स्टे. खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रवाना करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिपक रेवतकर मो.क्र. ९५४५५२३३६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर